वर्ष-०९ अंक-४५ मुंबई, मंगळवार २६ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर - २०२३ पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 रब्बी ज्वारीचे वाणा आणि त्यांची वैशिष्ट्ये

3 → वांझोट्या " समाजसेवकांची शहरांचे बकालीकरण वाढवणारी अनधिकृ त बॅनरबाजी निषेधार्य च

कॅ फेबा छु या खोलीत अश्लील चाळे, बेडचीही सोय; कोल्हापुरात धाड, निर्भ या पथकाला काय काय सापडलं? ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

## ट क्सी-रिक्षाचालकांचा भाडे नकार सुरूच ; कठोर कारवाई नसल्याने जरब कमी




मुंबई, ठाणे, वसई : एखाद्या ठिकाणी जाण्यासाठी विचारणा करताच टॅक्सी, रिक्षाचालकांकडून मिळणारा नकार आणि त्यानंतर यांना नेमके कुठे जायचे असते या प्रवाशांना पडणाऱ्या प्रश्नाचे उत्तर परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांच्या प्रयत्नांनंतरही मिळाल्याचे दिसत नाही. मुंबईसह ठाण्यात भाडे नाकारण्याच्या सर्वाधिक तक्रारींची नोंद वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागाकडे झाल्याचे दिसते. वसई-विरारमध्ये तर या तक्रारी करण्याचीही मुभा प्रवाशांना मिळत नसल्याचे दिसते. सणासुदीच्या उत्साहात बाजारपेठेतील गर्दी गेल्या काही महिन्यांपासून वाढली आहे. बाजारपेठा, स्थानकांचे परिसर येथे टॅक्सी, रिक्षाचालकांच्या रांगा उभ्या असतात. मात्र नागरिकांच्या वाट्याची पायपीट चुकलेली नाही. जवळचे, विशिष्ट ठिकाणचे भाडे सर्रास नाकारले जाते. त्यातून एखाद्या प्रवाशाने अधिक भाडे देण्याची तयारी दाखवलीच तर त्याला मात्र टॅक्सी किंवा रिक्षातून ईप्सित स्थळी जाता येते. गर्दी, सण-उत्सवांचे दिवस, पाऊस अशा वेळी हमखास प्रवाशांना नकार देण्याचे प्रकार अगदी रिक्षा आणि टॅक्सीचालकांकडून घडतात. मुंबई शहर आणि उपनगरांत वाहतूक विभागाने सुरू केलेल्या मदतवाहिनीवर रिक्षा, टॅक्सीचालकांविरोधातील सर्वाधिक तक्रारी भाडे नाकारण्याच्या आहेत. रिक्षा, टॅक्सीचालकांनी प्रवाशांशी गैरवर्तन केले, भाडे नाकारले, जादा भाडे मागितले तर प्रवासी थेट आरटीओच्या ...पान २ वर...

# आमदार अपात्रता याचिका अखेर मार्गी तीन ते चार महिने लागण्याची शक्यता

## मुख्यमंत्र्यांसह १६ आमदारांवर टांगती तलवार

**सुनावणीसाठी तीन-चार महिन्यांचा कालावधी अपेक्षित असून सर्वोच्च न्यायालयास त्याबाबतचे वेळापत्रक सादर के ले जाणार आहे.**



मुंबई : सर्वोच्च न्यायालयाने विलंबाबाबत कानउघाडणी केल्यानंतर आमदार अपात्रता याचिकांवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या समोर आज, सोमवारपासून सुनावणी सुरू होणार आहे. पहिल्या दिवशी सुनावणीचे प्रारूप किंवा रूपरेषा स्पष्ट केली जाण्याची शक्यता आहे. सुनावणीसाठी तीन-चार महिन्यांचा कालावधी अपेक्षित असून सर्वोच्च न्यायालयास त्याबाबतचे वेळापत्रक सादर केले जाणार आहे. आमदार अपात्रतेच्या याचिकांवर नार्वेकर यांनी नोटिसा बजावण्यापलीकडे काहीच केले नाही. त्यांनी तातडीने निर्णय द्यावा, अशी उद्धव ठाकरे गटाची मागणी आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्षांच्या वेळकाढूपणावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. तसेच पुढील सुनावणीच्या वेळी वेळापत्रक सादर करण्याचे आदेश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने मणिपूरमधील एका प्रकरणात तीन महिन्यांचा कालावधी विधानसभा अध्यक्षांना दिला होता. याचा दाखला ठाकरे गटाकडून दिला जात आहे. शिंदे आणि ठाकरे गटाच्या ५४ आमदारांविरोधात दोन्ही गटांकडून याचिका सादर करण्यात आल्या आहेत. प्रत्येक याचिकेवर दोन्ही बाजूंना युक्तिवादासाठी एक-दोन दिवस आणि त्यानंतर अंतिम युक्तिवादासाठी काही दिवसांचा कालावधी गृहीत धरल्यास निर्णयासाठी तीन ते चार महिने लागतील. शिंदे-ठाकरे गटाच्या पक्षप्रमुखांनाही बाजू मांडण्याच्या नोटिसा बजावण्यात येणार असून त्यांच्या युक्तिवादासही काही कालावधी लागणार आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन असून त्या काळात अध्यक्षांना सुनावणीसाठी वेळ मिळणार नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन सुनावणीचे वेळापत्रक निश्चित करण्यात येत असल्याचे उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले. नार्वेकर यांनी दोन्ही बाजूंच्या आमदारांना सोमवारी दुपारी पाचारण केले असून त्या वेळी सुनावणीबाबतचे तपशील जाहीर होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री शिंदे आणि त्यांच्या ...पान २ वर...

## लोकल ट्रे नमध्ये होणार मोठे बदल; एका निर्ण यामुळं प्रवाशांवर मोठ्या परिणामांची शक्यता



मध्य रेल्वेसंदर्भातील एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. सिग्नल तोडणं, वेगावर नियंत्रण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मोटरमनच्या केबिनमध्ये सीसीटीव्ही लावण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. यावरुन मध्य रेल्वेचे मोटरमन आता आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. या सीसीटीव्हीवरुन दिल्या जाणाऱ्या सूचनांमुळे लक्ष विचलतील होणार असल्याची तक्रार मोटरमन्सनं केली आहे. यामुळे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात येईल असा दावा मोटरमन्सनं केलाय. मोटरमनला मार्गदर्शन द्यायचे असल्यास एका लोकलमध्ये दोन मोटरमन ठेवावेत अशी मागणी त्यांनी ...पान २ वर...

# लालबागच्या राजाची प्रतिकृ ती गोल्डन नेस्ट च्या राजाचे मोठ्या वाद्यांच्या गजरात विसर्ज न















भाईदर (२५) - मिरा भाईदर रोड वर जुना गोल्डन नेस्ट या परिसरात मागील २२ वर्ष नित्यनियमाने गोल्डन नेस्टच्या राजाचे मोठया श्रद्धेने आगमन होते. सर्व तरुण मंडळी या सोहळ्यात सामील होऊन गणरायाचे पूजन करतात यामध्ये दरवर्षीप्रमाणे या वर्षीही आरोग्य शिबीर, लहान मुलांचे नृत्य तसेच विविध खेळ आयोजित केलेले असतात व त्या लहान मुलांचे उत्साह वाढवण्यासाठी त्यांना बक्षीशे देऊन गौरविण्यात येते. सार्वजनिक मंडळ असूनही कोणतेही व्यसन येथे केले जात नाही. त्याचप्रमाणे सर्व पक्षीय लोकनेते, नगरसेवक व मान्यवर यांना येथे सन्मानित करण्यात येते परंतु कोणत्याही पक्षाचा येथे वापर केला जात नाही. गेले २२ वर्ष या मंडळात मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी होते. आज या गणपतीचे विसर्जन मोठ्या धूमधडाक्यात करण्यात आले.

पोलीस
बातमी पत्र
पोलीस बातमी पत्र



# उसासाठी सूक्ष्म अन्नद्रव्य



**रासायनिक खतांचा असंतुलित वापर, सेंद्रिय खतांचा अत्यल्प व अनियमित वापर, सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खतांचा अत्यल्प वापर, जमिनीला विश्रांती न देणे, पिकांची योग्य फेरपालट न करणे, नेहमी एका जमिनीतून एकाच प्रकारच्या पिकाचे उत्पादन घेणे, जमिनीचा सामू जास्त असणे, मुक्त चुन्याचे प्रमाण जास्त असणे इत्यादी अनेक कारणांमुळे सूक्ष्म अन्नद्रव्यांची जमिनीमध्ये उपलब्धता कमी जाणवते. त्यांच्या कमतरतेमुळे पीकवाढीवर अनिष्ट परिणाम दिसून येतो. पर्यायाने ऊस व साखर उत्पादनात घट येते.**

मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे सूक्ष्म अन्नद्रव्यांबाबतच्या झालेल्या संशोधनावरून असे आढळून आले आहे, की राज्यातील उसाखालील जमिनींमध्ये लोह, मँगनिज, जस्त आणि बोरॉन या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता प्रकर्षाने जाणवते.

सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करताना ते जसेच्या तसे जमिनीत घालू नयेत. सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते ही शेणखतात १:१० या प्रमाणात मिसळून दिल्यास जास्त फायद्याचे ठरते. यासाठी एक किलो सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खत चांगले कुजलेल्या दहा किलो शेणखत किंवा कंपोस्ट खतात मिसळून त्यावर पाणी शिंपडावे व पाच ते सहा दिवसांनी चांगले मुरल्यावर ते रासायनिक वरखतांच्या मात्रेसोबत जमिनीत चळी घेऊन द्यावे, त्यामुळे जमिनीमध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते.

**जस्त (झिंक):-** १) पिकांची वाढ करणाऱ्या संप्रेरकांच्या निर्मितीसाठी. २) वनस्पतीमध्ये इंडोल ॲसिटिक ॲसिड तयार होण्यासाठी ट्रिप्टोफेनच्या निर्मितीची आवश्यकता असते व त्यासाठी जस्ताची आवश्यकता असते. ३) वनस्पतीत प्रथिने, न्यूक्लीक आम्लांच्या निर्मितीत सहभाग. ४) वनस्पतींच्या पाणी शोषण कार्यात जस्ताची मदत होते. ५) वेगवेगळी विकरे निर्मितीसाठी जस्त आवश्यक.

६) अति उष्णता, धुके व पूर परिस्थिती असल्यास पिकामध्ये प्रतिकारक्षमता वाढविते.

**कमतरतेची लक्षणे:-**
१) उसाची पाने लहान व अरुंद दिसतात. २) पानांत हरितद्रव्यांचा अभाव दिसू लागतो, पानांच्या शिरा हिरव्याच असतात. ३) ऊस पिकात मुख्य शिरेजवळ पांढरे पट्टे दिसतात. पानांचे पाते अरुंद होऊन टोके लहान होतात. उसावर मेणाच्या थराचे आवरण दिसते, तसेच कांड्या आखूड पडतात.

**उपाययोजना:-** जस्ताची कमतरता असलेल्या जमिनीत ऊस लागवड करताना प्रतिहेक्टरी २० किलो झिंक सल्फेट शेणखतात मुरवून दिल्यास ऊस उत्पादनात भरघोस वाढ होते. खोडवा पिकासदेखील २० किलो झिंक सल्फेट प्रतिहेक्टरी वापरल्यास उत्पादन वाढते.

**लोह (फेरस):-** १) पानांचा हिरवा रंग हा हरितद्रव्यामुळे येत असतो आणि म्हणून हरितद्रव्यांच्या निर्मितीसाठी लोहाची गरज असते. २) प्रथिने व विकर यांच्या निर्मितीत लोहाचा महत्त्वाचा सहभाग असतो. ३) प्रकाशसंश्लेषण व श्वसनक्रियेत लोहाचा सहभाग असतो.

**कमतरतेची लक्षणे:-**
१) हरितद्रव्यांच्या अभावामुळे पानांच्या शिरांमधील भाग पिवळा पडतो व शिरा हिरव्या दिसतात. २) लोहाची तीव्रता खूपच जास्त असेल, तर पानांच्या या हिरव्या शिरादेखील पिवळ्या पडतात आणि पाने पूर्णपणे पांढरी पडतात. ३) पिकांच्या मुळांच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो.

**लोहयुक्त खतांचा वापर:-** लोहाची कमतरता असलेल्या जमिनीत लागणीच्या वेळी उसाला प्रत्येकी २५ किलो फेरस सल्फेट प्रतिहेक्टरी शेणखतात मुरवून दिल्यास उत्पादनात वाढ झाल्याचे दिसून आले आहे. खारवट-चोपण किंवा पूरबुडीत क्षेत्राच्या ठिकाणी हेक्टरी ५० किलो फेरस सल्फेट वापरल्यास ऊस व साखर उतारा वाढल्याचे दिसून आले आहे. ▌

# रब्बी ज्वारीचे वाण आणि त्यांची वैशिष्ट्ये

**दर्जेदार उत्पादनासाठी रब्बी ज्वारीच्या संकरित व सुधारित जातीचे शुद्ध बियाणे पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणे आवश्यक असते. या अनुषंगाने महात्मा फुले कृषी विद्यापीठाने जमिनीच्या खोलीनुसार, ज्वारीचे विविध वाण राज्यातील शेतकऱ्यांसाठी विकसित केले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाने जरी ज्वारीची लागवड ही १५ ऑक्टोबरपर्यंत करण्याची शिफारस केली आहे तरी काही शेतकरी १५ सप्टेंबरनंतर पेरणीला सुरुवात करतात, तर काही शेतकरी हस्ताचा पाऊस पडून गेल्यानंतर पेरणी करतात. विविध भागातील पाऊस परिस्थिती, जमिनीतील उपलब्ध ओलाव्यानुसार पेरणीचे नियोजन करणे आवश्यक आहे. तत्पूर्वी ज्वारीच्या वाणांची निवड ही अत्यंत महत्त्वाची. त्याकरिता कोरडवाहू व बागायती क्षेत्रासाठी ज्वारीचे वाण व त्यांची वैशिष्ट्ये या बाबत माहिती जाणून घेऊ..**

जमिनीच्या खोलीनुसार कोरडवाहू आणि बागायती क्षेत्रासाठी रब्बी ज्वारीचे शिफारस केलेले सुधारित/संकरित वाण:-

हलकी जमीन ( खोली ३० से.मी):- फुले अनुराधा, फुले माऊली, फुले यशोमती.

मध्यम जमीन (खोली ६० से.मी):- फुले सुचित्रा, फुले माऊली, परभणी मोती, मालदांडी, ३५-१.

भारी जमीन (६० से.मी पेक्षा जास्त):- सुधारित वाण : फुले वसुधा, फुले यशोदा, सी.एस. व्ही२२, परभणी मोती.

**संकरित वाण:-** सी.एस. एच.१५ आणि सी.एस.एच.१९.

बागायतीसाठी:- फुले रेवती, फुले वसुधा, सी.एस.व्ही.१८, सी.एस.एच.१५,सी.एस.एच. १९

**हुरड्यासाठी:-** फुले उत्तरा, फुले मधुर.

**लाह्यांसाठी:-** फुले पंचमी

**पापडासाठी:-** फुले रोहिणी

**काही जाती व वैशिष्ट्ये:-**

**फुले यशोमती:-** पश्चिम महाराष्ट्रातील हलक्या जमिनींकरिता कोरडवाहूखाली फुले अनुराधा ऐवजी प्रसारित. धान्य उत्पादन -९.२ क्विं./हे. चारा उत्पादन -४२.६ क्विं./हे. शुभ्र पांढऱ्या आकाराचे गोलाकार दाणे. पक्वता कालावधी -११२ ते ११५ दिवस. पश्चिम महाराष्ट्रातील जिरायत क्षेत्रातील उथळ जमिनीसाठी शिफारस.

**फुले अनुराधा:-** कोरडवाहू क्षेत्रासाठी, हलक्या जमिनीसाठी लागवडीस योग्य. पक्व होण्याचा कालावधी १०५ ते ११० दिवस. अवर्षणास प्रतिकारक्षम. भाकरी उत्कृष्ट, चवदार, कडबा अधिक पौष्टिक व पाचक, खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम.

**फुले माऊली:-** हलक्या व मध्यम जमिनीसाठी लागवडीस योग्य. पक्व होण्याचा कालावधी ११० ते ११५ दिवस. भाकरीची चव उत्तम. कडबा पौष्टिक व चवदार. धान्याचे उत्पादन हलक्या जमिनीत हेक्टरी ७-८ क्विं. व कडबा. धान्याचे उत्पादन मध्यम जमिनीत हेक्टरी १५-२० क्विं. व कडबा ४०-५० क्विंटल.



**फुले सुचित्रा:-** मध्यम जमिनीसाठी शिफारस. पक्व होण्याचा कालावधी ११० ते ११५ दिवस. उत्कृष्ट धान्य व कडबा प्रत. धान्य उत्पादन २४-२८ क्विंटल व कडबा ६०-६५ क्विंटल.

**फुले वसुधा:-** भारी जमिनीकरिता कोरडवाहू व बागायती जमिनीसाठी शिफारस. पक्व होण्याचा कालावधी ११६ ते १२० दिवस. दाणे मोत्यासारखे, पांढरेशुभ्र चमकदार. भाकरीची चव उत्तम. ताटे भरीव, रसदार व गोड. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. कोरडवाहू धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी २४-२८ क्विं. व कडबा ६५-७० क्विं. बागायती धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी ३०-३५ क्विं. व कडबा ७०-७५ क्विंटल.

**फुले यशोदा:-** भारी जमिनीत लागवडीसाठी प्रसारित. पक्व होण्याचा कालावधी १२० ते १२५ दिवस. दाणे मोत्यासारखे, पांढरेशुभ्र चमकदार, भाकरीची चव चांगली. कोरडवाहू धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी २५-२८ क्विं./हे. बागायती धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी ३०-३५ क्विं./हे. कडबा ७०-८० क्विं./हेक्टर.

**फुले पूर्वा :-** पाण्याचा ताण सहन करणारा. महाराष्ट्रातील जिरायत भागातील खोल काळ्या जमिनीसाठी शिफारशीत. कालावधी ११८ ते १२० दिवस. पांढरे शुभ्र टपोरे व गोलाकार दाणे. न लोळणारा, काढणीस सुलभ. धान्य उत्पादन २३.७ क्विं./हे. व कडबा ७०-८० क्विं./हेक्टर.

**सीएसव्ही.२२:-** भारी जमिनीकरिता कोरडवाहू व बागायती जमिनीसाठी शिफारस. पक्व होण्याचा कालावधी ११६ ते १२० दिवस. दाणे मोत्यासारखे चमकदार, भाकरीची चव चांगली. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. कोरडवाहू धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी २४-२८ क्विं. व कडबा ६५-७० क्विं. बागायती धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी ३०-३५ क्विं. व कडबा ७०-८० क्विंटल.

**परभणी मोती:-** भारी जमिनीकरिता कोरडवाहू व बागायती जमिनीसाठी शिफारस. पक्व होण्याचा कालावधी १२५ ते १३० दिवस. दाणे मोत्यासारखे, पांढरेशुभ्र चमकदार, खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. कोरडवाहू धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी १७ क्विं. व कडबा ५०-६० क्विं. बागायती धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी ३२ क्विं. व कडबा ६०-७० क्विंटल.

**फुले रेवती:-** भारी जमिनीत बागायतीसाठी शिफारस. पक्व होण्याचा कालावधी ११८ ते १२० दिवस. दाणे मोत्यासारखे, पांढरे चमकदार, भाकरीची चव उत्कृष्ट, कडबा पौष्टिक व अधिक पाचक धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी ४०-४५ क्विंटल.

**मालदांडी ३५-१:-** मध्यम खोल जमिनीत कोरडवाहूसाठी शिफारस. पक्व होण्याचा कालावधी ११८ ते १२० दिवस. दाणे चमकदार, पांढरे. भाकरीची चव चांगली. खोडमाशी प्रतिकारक्षम. धान्य उत्पादन सरासरी प्रतिहेक्टरी १५-१८ क्विंटल.

**फुले उत्तरा:-** हुरड्यासाठी शिफारस. हुरड्याची अवस्था येण्यास ९०-१०० दिवस. भोंडातून दाणे सहज बाहेर पडतात. सरासरी ७०-९० ग्रॅम इतका हुरडा मिळतो. हुरडा चवीस सरस अत्यंत गोड आहे.

**फुले पंचमी:-** लाह्याचे प्रमाण ८७.४ टक्के. लाह्या मोठ्या प्रमाणात फुटून रंगाने पांढऱ्या शुभ्र होतात. महाराष्ट्रातील कोरडवाहू क्षेत्रासाठी लाह्यांसाठी प्रसारित. शक्यतो हस्ताचा पाऊस पडून गेल्यावर पेरणी करणे हिताचे आहे. योग्य वेळी पेरणी न झाल्यास खोडमाशीचा प्रादुर्भाव अधिक होतो. पेरणीपूर्वी बियाण्यास गंधकाची प्रक्रिया करावी. त्यासाठी १ किलो बियाण्यास ३०० मेष गंधकाची ४ ग्रॅम याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. १० किलो बियाण्यास प्रत्येकी २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व पीएसबी या जीवाणू संवर्धनाची प्रक्रिया करावी. पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने ४५ बाय १५ से.मी अंतरावर एकाच वेळी खते व बियाणे स्वतंत्र दोन चाड्यातून पेरावे.



# दुभत्या जनावरांचे व्यवस्थापन

**दुभत्या जनावरांच्या व्यवस्थापनाचा परिणाम दुधातील फॅट आणि डिग्रीच्या प्रमाणावर होतो. दोन वेळा धार काढण्यामधील कालावधी वाढल्यास दूध जास्त मिळते, परंतु फॅटचे प्रमाण कमी होते. कालावधी कमी झाल्यास दूध उत्पादन कमी होऊन फॅटचे प्रमाण वाढते. यासाठी दूध काढण्याच्या वेळात समान अंतर ठेवावे. कासेतील दूध संपूर्ण काढल्यास फॅट जास्त निघते. वेतामध्ये दूध वाढते तसतसे फॅट कमी होते आणि जसजसे दुधाचे उत्पादन कमी होते तसे फॅटचे प्रमाण वाढते.**



जनावर विण्याच्या वेळी जनावराची तब्येत उत्तम असल्यास भरपूर दूध व जास्त फॅट मिळते. दूध काढताना जनावर घाबरल्यास दूध उत्पादन आणि फॅटचे प्रमाण घटते. पावसाळा आणि हिवाळ्यात दूध उत्पादन जास्त, फॅटचे प्रमाण कमी आणि उन्हाळ्यात दूध उत्पादन कमी होऊन फॅटचे प्रमाण जास्त मिळते.

**उष्ण तापमानाचा परिणाम:-**
संकरित गायींना २० ते २७ अंश सेल्सिअस तापमान अनुकूल असते, परंतु जेव्हा तापमान २७ अंश सेल्सिअसच्या वर जाऊ लागते तेव्हा दुधातील फॅट कमी होऊ शकते. हे प्रमाण १५ ते २० टक्क्यांपर्यंत असू शकते. म्हणून गोठ्यातील तापमान अनुकूल ठेवण्याची सोय करावी. यासाठी गोठ्यात पडदे लावून पाणी मारावे. गोठ्याच्या पत्र्यावर कडबा ठेवून पत्रे उष्ण होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

**वेतातील दिवस:-**
गाय किंवा म्हैस व्याल्यानंतर पहिले दहा दिवस दुधातील फॅट चांगले असते. जसजसे दूध वाढत जाते तसे फॅट कमी होत जाते.

- व्यायल्यानंतर दोन ते चार महिन्यांपर्यंत दुग्धोत्पादन थोडे थोडे वाढते. त्यानंतर वाढून स्थिर राहते.

- ज्या वेळी जनावर आटण्यास येते त्याच्या अगोदर काही आठवडे जर जनावरांचे दूध उत्पादन कमी झाले असेल तर त्यातील फॅटचे प्रमाण वाढलेले असते.

- गाई-म्हशींच्या सहा वेतांनंतर फॅट आणि डिग्री घटकांचे प्रमाण कमी होते. वृद्ध दुधाळ जनावरांच्या दुधातील फॅटचे प्रमाण बरेच कमी होते.

- विताना गाय-म्हैस अशक्त असल्यास अशा जनावरांपासून येणाऱ्या दुधात फॅटचे प्रमाण कमी आढळते.

- गाई- म्हशींचे वेत जसे वाढत जाते, तसे दुधातील फॅटचे प्रमाण कमी होत जाते.

**दूध वाहतूक-**
बहुतांश वेळा दूरवरच्या वाहतुकीत दूध हिंदकळले जाते. दुधातील फॅटचे कण किटलीच्या झाकणास चिकटून वाया जातात, त्यामुळे दुधातील फॅट कमी होते.

**व्यवस्थापनातील त्रुटी:-**
व्यवस्थापनातील काही त्रुटींमुळे देखील दुधातील फॅट कमी होते. उदा. काही वेळा दुधात कचरा असल्यास ते स्वच्छ करण्यासाठी दूध कापडाच्या साह्याने गाळण्यात येते; परंतु असे केल्याने दुधातील फॅट वाया जाते. म्हणून दूध नेहमी कापडाऐवजी गाळणीच्या साह्याने गाळावे कारण गाळणीची छिद्रे कापडाच्या छिद्राच्या तुलनेत आकाराने मोठी असतात. त्यामुळे फॅटचे गोलक गाळणीवर न राहता दुधासोबत जातात.

अशाप्रकारे म्हशींची काळजी घ्यावी.

## लोकल ट्रे नमध्ये होणार मोठे बदल;

केलीय. त्यामुळे पुढील दोन दिवसांत सीसीटीव्ही लावण्याचा प्रस्ताव मागे न घेतल्यास अनंत चतुर्दशीनंतर आंदोलन केलं जाईल अशी भूमीका मध्य रेल्वेच्या मजदूर संघाकडून घेण्यात आलीये. सुरक्षितता वाढवण्यासाठी आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी, मध्य रेल्वेने दोन लोकल ट्रेनमध्ये सिग्नल लोकेशन अनाउन्समेंट सिस्टम (SILAS) आणि ॲडव्हान्स ड्रायव्हर असिस्टंट सिस्टम (ADAS) लावण्यात आली आहे. मध्य रेल्वेनुसार, या प्रणाली लोकल ट्रेन चालवण्याच्या पद्धतीमध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज आहेत. या प्रकल्पाच्या यशामुळे त्यांचा हळूहळू सर्व लोकल गाड्यांचा विस्तार होणार आहे. मात्र, या प्रणालीवर मोटरमन खूश नसून, रेल्वे प्रशासनाने याचा वापर बंद न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, लोकल ट्रेनमध्ये एसआयएलएएस आणि एडीएएसची अंमलबजावणी प्रवासी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

## आमदार अपात्रता याचिका

समर्थक आमदारांना मदत होईल अशीच अध्यक्ष नार्वेकर यांची आतापर्यंतची कृती असल्याचा आरोपही शिवसेनेच्या ठाकरे गटाने केला होता. प्रकरण काय? एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेच्या ठाकरे गटाने तात्काळ शिंदेंसह त्यांच्या गटातील १६ आमदारांना अपात्र ठरविण्यासाठी उपाध्यक्षांकडे (तेव्हा अध्यक्षपद रिक्त होते) अर्ज केला होता. त्यानंतर शिंदे यांना साथ देणाऱ्या सर्व ४० आमदारांना अपात्र ठरविण्याकरिता अर्ज दाखल करण्यात आला. शिंदे गटाने आदित्य ठाकरे वगळता ठाकरे गटाच्या १४ आमदारांना अपात्र ठरविण्याकरिता अध्यक्षांकडे अर्ज दाखल केला होता. अशा रीतीने ५४ आमदारांच्या अपात्रतेवर अध्यक्षांना निर्णय घ्यायचा आहे. न्यायालयाच्या ताशेऱ्यांनंतर.. सर्वोच्च न्यायालयाने ११ मे रोजी दिलेल्या निकालपत्रात विधानसभा अध्यक्षांनी अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा, असा आदेश दिला होता. गेले चार महिने अध्यक्ष नार्वेकर सातत्याने वेळकाढूपणा करीत असल्याचा ठाकरे गटाचा आक्षेप आहे. त्या संदर्भात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी अध्यक्षांच्या वेळकाढूपणावर ताशेरे ओढले होते. तसेच पुढील सुनावणीच्या वेळी वेळापत्रक सादर करण्याचे आदेश दिले आहेत. दोन्ही बाजूंच्या आमदारांना सुनावणीसाठी पाचारण करण्यात आले आहे.

या वेळी रूपरेषा निश्चित केली जाईल. सर्वोच्च न्यायालयाला अवगत केले जाईल. ही सुनावणी लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.
– राहुल नार्वेकर, विधानसभा अध्यक्ष

## टॅक्सी-रिक्षाचालकांचा

व्हॉट्सॲप क्रमांकावर किंवा ईमेलवर तक्रार दाखल करतात. त्यात वडाळा, अंधेरी, बोरिवली आरटीओच्या क्षेत्रात साधारण दोन महिन्यांत म्हणजे १५ जुलै ते २० सप्टेंबपर्यंत चालकांनी भाडे नाकारल्याच्या साधारण ५७७ तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत. ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर ही शहरे ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात येतात. या सर्वच शहरांमध्ये गेल्या नऊ महिन्यांत भाडे नाकारणाऱ्या २९१ प्रवासी वाहनांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई करून १४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. त्यात केवळ रिक्षांचा समावेश आहे. शहरात काळ्या-पिवळी टॅक्सीने प्रवास करण्याचे प्रमाण नगण्य असून शहरातील अंतर्गत प्रवासासाठी रिक्षांचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. यामुळे कारवाईत रिक्षांची संख्या जास्त आहे, असे वाहतूक पोलिसांनी सांगितले. तसेच ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाकडून भाडे नाकारणाऱ्या ६४ प्रवासी वाहनांवर कारवाई केली आहे. वसईत तक्रारीलाही जागा नाही. वसई- विरार शहरात अनेकदा प्रवाशांना नेण्यास नकार देण्याचे प्रकार घडतात; परंतु त्याची तक्रार करण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन विभागाचा मदत क्रमांक उपलब्ध नाही. त्यामुळे तक्रार करायची कुठे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. तक्रारींवर भरारी पथकाला सांगून कारवाई केली जाते, असे उपप्रादेशिक परिवहन विभागाचे सहायक अधिकारी प्रवीण बागडे यांनी सांगितले आहे. मीरा-भाईंदरमध्ये एकही तक्रारी आलेली नसल्याचे वाहतूक पोलीस निरीक्षक देवीदास हांडोरे यांनी सांगितले. तक्रारी किती? वडाळा आरटीओ (१७ जुलै ते २१ सप्टेंबर) – २४६ बोरिवली आरटीओ (१७ जुलै ते २२ सप्टेंबर) – १०१ अंधेरी आरटीओ (१५ जुलै ते २२ सप्टेंबर) – २३० ठाणे पोलीस आयुक्तालय – (जानेवारी ते सप्टेंबर) – २९१ ठाणे प्रादेशिक परिवहन विभाग – (जानेवारी ते सप्टेंबर) ड्ड ६४ अनधिकृत शेअर टॅक्सी बहुतेक ठिकाणी मीटरनुसार भाडे नाकारले जाते. मान्यता नसतानाही शेअर टॅक्सी किंवा रिक्षा चालवल्या जातात. त्यासाठी प्रत्येक माणसानुसार भाडे आकारले जाते. त्यामुळे एकट्याच प्रवाशाला इतर दोन किंवा तीन प्रवासी मिळेपर्यंत वाट पाहावी लागते अथवा घाई असल्यास चार प्रवाशांचे म्हणजे मीटरपेक्षा अधिक भाडे द्यावे लागते.

## गळ्याला चाकू लावला, 15 वर्षीय

पोलिस अधिक तपास करत आहे. पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्ह दाखल मुली, महिलांवर अत्याचारात वाढ होत असताना आता पुन्हा एकदा जवळच्या, ओळखीच्या लोकांकडून अत्याचाराची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी भारतीय दंड विधान संहिता कलम आणि पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेने खेळण्या बागडण्याच्या वयात मुलं कोणत्या थराला जात आहेत, यावरून आता पालकांच्या चिंतेत भर पडली आहे. आरोपीच्या शोधात पोलिसांचे पथक परराज्यात रवाना पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलुंड येथे हा धक्कादायक प्रकार घडला आहे. 15 वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला आहे. चाकूचा धाक दाखवून तसेच आईला जिवे मारण्याची धमकी देऊन अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला आहे. मुलुंड पोलिसांनी सामुहिक बलात्कार आणि पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी 21 वर्षीय तरूणाला अटक करण्यात आली आहे. तर दुसऱ्या आरोपीच्या शोधात पोलिसांचे पथक परराज्यात रवाना झाले आहे. गुंगीच औषध देऊन अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे एफआयआरमध्ये नमुद करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी वेगवेगळ्या अँगलने तपास सुरू केला असल्याची माहिती सुत्रांनी दिली. मुंबईत महिलांची सुरक्षा धोक्यात मुंबईमध्ये गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारांकडून कायदा आणि सुव्यवस्था धाब्यावर बसवली जात आहे. त्यामुळे महिलांची सुरक्षाही धोक्यात आल्याचं चित्र आहे. मुंबई पोलिसांचा गुन्हेगारांवर धाक नसल्याचं दिसून येत आहे. त्याचमुळे या अशा प्रकारच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

## चित्तथरारक ! अट्टल गुन्हेगार पुढे पोलीस

आहे. पोलिसांनी अटक केलेला गुड्डु हा रेकॉर्डवरील अट्टल गुन्हेगार आहे. तर, गुड्डू हा काहीतरी घातपात करण्याच्या इराद्याने स्वतः जवळ पिस्टल बाळगून परिसरामध्ये पिस्टलचा धाक दाखवून धमकावत असल्याची माहिती पुंडलिकनगर पोलिसांना मिळाली होती. महिती मिळताच पुंडलिकनगर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांनी मिळालेल्या माहितीनुसार कारवाई करण्यासाठी पथकाला सूचना केल्या. ज्यात पोलीस उपनिरीक्षक आनंद बनसोडे, पोलीस उपनिरीक्षक एस. बी. काळे यांच्यासह पथकाला कारवाईसाठी तत्काळ रवाना होण्याचे सांगितले. दरम्यान, कारवाईसाठी गेलेल्या पथकाने मिळालेल्या माहितीनुसार गुड्डूचा शोध सुरु केला.

## हात कापून टाके न' वरळी सी-लिंकवर

सी-लिंकवरुन जाण्यापासून रोखतात आणि गाडी बंद करण्यास सांगतात. तर ती महिला ट्रॅफिक पोलिसांवर अरेरावी करण्यास सुरुवात करते, मी गाडी बंद करणार नाही, मी या देशाची नागरीक आहे आणि मी टक्स भरतेय त्यामुळे या रस्त्यावरुन प्रवास करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे, असं महिला ट्रॅफिक पोलिसांना सांगते. ती एवढ्यावरच थांबत नाहीतर ती, जा जाऊन नरेंद्र मोदींना फोन करा, त्यांनी जर मला सांगितलं नुपूर गाडी बंद कर, तरंच मी करणार, असं उद्धटपणे सांगत महिलेनं अरेरावी सुरू केली. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर वरळी पोलिसांनी नुपूर पटेलला अटक केली. मात्र त्यानंतर त्यांची जामीनावर सुटका करण्यात आली. ही महिला मध्य प्रदेशातील जबलपूरची असून पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिलेला वरळी-वांद्रे सीलिंकवरुन मोटारसायकलनं प्रवास करण्यास निर्बंध असल्याचं माहिती नव्हतं, आपल्या भावाला भेटण्यासाठी पटेल तिच्या मोटरसायकलवरून मध्य प्रदेशातून पुण्याला गेली होती. पुण्यातून नंतर ती मुंबईला फिरण्यासाठी आली आणि तिला वांद्रे-वरळी सी लिंक बघायचा होता. ती सी-लिंक वरून गेली आणि तेव्हा तिला पोलिसांनी अडवलं. तिला नियमांबाबत कल्पना नसल्यामुळे तिला राग अनावर झाला आणि तिनं अरेरावी केली."सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 15 सप्टेंबरला हा प्रकार घडला असून तिला थांबवण्यात आलं, तेव्हा ती वरळीच्या बाजूनं सी-लिंकवर आली होती. पोलिसांनी तिला थांबवण्याचा प्रयत्न केला असता, ती पुढे निघून गेली. मात्र पुढे उभे असलेल्या ट्रॅफिक पोलिसांनी या महिलेसंदर्भात कळवण्यात आलं आणि ती पकडली गेली. वरळी पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम 353, 186, 279, 336 आणि मोटार वाहन कायद्याच्या कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

## वाहतुक पोलिसाच्या डोक्यात मारले

पण त्याच्याकडे चालक परवाना नव्हता. त्यामुळे त्यांनी आरोपीवर दंडात्मक कारवाई केली असता आरोपीला राग आला. त्याने हातातील हेल्मेट वाहतुक पोलिसाच्या डोक्यात मारले व तेथून पळण्याचा प्रयत्न करू लागला. पण वाहतुक पोलिसाने मोठ्या शिताफीने त्याला घटनास्थळावरच ताब्यात घेतले. त्यानंतर शीव पोलीस ठाण्यात नेऊन आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. भादंवि कलम ३५३ (सरकारी कामात अडथळा निर्माण करणे) व ३३२ (सरकारी कर्मचाऱ्याला मारहाण करणे) आदी कलमांतर्गत शीव पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. त्याला याप्रकरणी अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## संपादकीय...



# करकोचा आणि खीर!

सुमारे ३६ वर्षांपूर्वी पहिल्यांदा राजीव गांधी यांनी प्रस्तावित केलेले, नंतर नरसिंह राव यांनी ज्यासाठी आवश्यक घटनादुरुस्ती केली ते, देवेगौडा यांनी पंतप्रधानपदाच्या काळात जे प्रत्यक्ष सादर केले ते, इंदरकुमार गुजराल यांनी आपल्या अल्पकालीन सरकारच्या काळात ज्यासाठी प्रयत्न केले ते, पंतप्रधानपदी अटलबिहारी वाजपेयी असताना ममता बॅनर्जी आणि सुमित्रा महाजन यांनी ज्याचा आग्रह धरला होता ते, ज्याच्यासाठी वाजपेयी यांनी सर्वपक्षीय बैठका आयोजित केल्या ते, नंतर मनमोहन सिंग-सोनिया गांधी यांनी ज्यासाठी प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भाजपचे सहकार्य मागितले ते, समाजवादी मुलायमसिंह यादव आणि 'भ्रष्ट' लालूप्रसाद यादव यांच्या बरोबरीने भाजपने ज्यास विरोध केला ते, भाजपच्या समाजमाध्यमी गणंगांनी ज्यास एके काळी हिणकस शब्दांत विरोध नोंदवला होता ते महिलांना आरक्षणाचा अधिकार देणारे विधेयक मणिपुरातील महिलांची अवहेलना, महिला कुस्तीगिरांची विटंबना, उनाव, हाथरस इत्यादी ठिकाणी स्त्रियांवरील अत्याचार प्रकरणांत सत्ताधाऱ्यांची पुरती शोभा झाल्यानंतर अखेर नरेंद्र मोदी सरकारने लोकसभेत सादर केले. याबद्दल सरकारचे अभिनंदन करावे तितके थोडे. जे सरकार 'यत्र नार्युस्तु पूज्यन्ते..' इत्यादी सुभाषितांची वरचेवर पखरण करत असते त्या सरकारने आगामी निवडणुकांच्या तोंडावर का असेना पण महिला आरक्षणाचे विधेयक मांडले यापेक्षा अधिक पुरोगामी बाब ती काय? अशा तऱ्हेने महिलांस सर्व प्रतिनिधिगृहांत ३३ टक्के इतके प्रतिनिधित्व 'लवकरच' मिळू लागेल. यातील लवकरच म्हणजे कधी या प्रश्नाचा ऊहापोह करण्याआधी महासत्ता होऊ पाहणारा भारत महिलांचा योग्य तो सन्मान करण्याच्या मुद्द्यावर कोठे आहे, हे पाहाणे उद्बोधक ठरावे.

कारण ज्या देशात महिलांस देवता, प्रकृती, माता इत्यादी पूजनीय विशेषणांनी मढवले जाते त्या भारतवर्षांत केंद्रीय प्रतिनिधिगृहात महिलांचे प्रतिनिधित्व १४-१५ टक्के इतकेही नाही. अर्थात हे सबका साथ सबका विकास म्हणत सर्वात मोठ्या अल्पसंख्यांस सर्वात कमी, खरे तर नगण्य, प्रतिनिधित्व देण्यासारखेच. त्यामुळे महिला गौरवगाथांची पारायणे सातत्याने केली जातात त्या देशात महिलांना सत्ताकारण, राजकारण यांत सर्वात कमी प्रतिनिधित्व आहे, हे आश्चर्य नाही. पण आश्चर्य हे की अशी काही सुवचने, सुविचार नसतानाही दक्षिण आफ्रिकेसारख्या 'मागास' देशातील प्रतिनिधिगृहांत महिलांचे प्रमाण ४५ टक्के आहे. अत्यंत भोगवादी वगैरे अशा ब्राझील देशात ते १८ टक्के आहे आणि आपला शेजारी चीनमध्ये २७ टक्के महिला प्रतिनिधिगृहात आहेत. हे आपली ज्यांच्याशी स्पर्धा आहे त्या ब्राझील, चीन, दक्षिण आफ्रिका इत्यादी देशांबाबतचे वास्तव. अमेरिका, इंग्लंड आदी प्रगत देशांत ते २५-३० टक्क्यांच्या आसपास आहे यात काही आश्चर्य नाही. आपल्याकडे राजकीय पक्षांकडून दिल्या जाणाऱ्या उमेदवारांत मुदलात महिलांचे प्रमाण ७-८ टक्के इतकेच असते. तेव्हा आडातच जे नाही ते संसदेच्या पोहऱ्यात कसे येणार हा प्रश्न. पण त्याच वेळी तमिळनाडू, आंध्र प्रदेश, आसाम, बिहार आदी राज्यांत स्थानिक पंचायतींमध्ये महिलांची संख्या पुरुषांच्या बरोबरीने आहे हे विशेष. यापैकी अनेक राज्यांत महिलांसाठी ५० टक्के आरक्षण आहे. म्हणजे कनिष्ठ पातळीवरील निर्णयप्रक्रियेत स्थान दिल्या जाणाऱ्या महिलांचे प्रमाण सत्ता-अधिकार वर वर चढत गेले की कमी कमी होत जाते, असे दिसते. या वास्तवात नव्या आरक्षणामुळे बदल होऊ शकेल. लोकसंख्येत जवळपास ५० टक्के इतक्या संख्येने असलेल्या महिलांना ताजे विधेयक ३३ टक्के आरक्षण देऊ पाहते.

कधीपासून हा यातील कळीचा मुद्दा. सरकारच्या अन्य अनेक तत्पर कल्याणकारी योजनांप्रमाणे हे आरक्षण लगेच लागू होणार नाही. याच सरकारने वास्तविक विशेष अध्यादेशाद्वारे घटनेत अनुस्यूत नसतानाही आर्थिक मागासांसाठी १० टक्के आरक्षण तातडीने लागू करण्याचा निर्णय घेऊन दाखवलेला आहे. त्यास गेल्या सार्वत्रिक निवडणुकांची पार्श्वभूमी होती. महिला आरक्षणास आगामी निवडणुकांची पार्श्वभूमी आहे. पण तरीही या मुद्द्यावरही महिलांस दिली जाणारी वागणूक दुय्यम नाही, असे म्हणता येणार नाही. आर्थिक मागासांस दिल्या गेलेल्या आरक्षणाप्रमाणे महिला आरक्षणही लवकरात लवकर अमलात आणण्याचा मार्ग सरकारने पत्करलेला नाही. उलट या आरक्षणासाठी निवडलेला मार्ग अधिकाधिक विलंबकारीच आहे. उदाहरणार्थ सरकार म्हणते आधी जनगणना केली जाणार, त्यानंतर मग लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना केली जाणार आणि मग त्यानंतर हे आरक्षण अमलात येणार. वास्तविक नियमाप्रमाणे २०२१ साली जनगणना सुरू होणे अपेक्षित होते. पण त्या वर्षी करोनाचे कारण पुढे करीत जनगणना टाळली गेली. आता करोना अनेकांच्या विस्मरणात जाईल इतका काळ लोटला असतानाही जनगणना हाती घेतली जाईल याची कोणतीही चिन्हे नाहीत.

# वांझोट्या " समाजसेवकांची शहरांचे बकालीकरण वाढवणारी अनधिकृत बॅनरबाजी निषेधार्यच !

गेल्या दशकामध्ये जनतेला समाजसेवकांची ओळख हि त्यांच्या जनतेप्रतीच्या कामातून होत असे . अडलेल्या -नडलेल्या नागरिकांना समाजसेवक हे मोठा आधार वाटत असे कारण समस्या -प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी हि मंडळी सदैव तत्पर असत . धावून येत असत . अशा मंडळींची समाजाप्रती असणारी कामे , सेवा लक्षात घेत समाजच स्वतः हुन त्यांना "समाजसेवक " अशी उपाधी लावत असत . 'समाजमान्य समाजसेवक ' अशी हि मंडळी असत. काळ बदलत गेला आणि समाजसेवकांची परिभाषा बदलत गेली . अलीकडच्या काळात समाजसेवकांची ओळख जनतेला होती ती गणेशोत्सव ,नवरात्रोत्सव , दहीहंडी , दसरा - दिवाळी अशा उत्सवाच्या वेळी राज्याच्या कानाकोपऱ्यात लावल्या जाणाऱ्या बॅनर्समधून . या मंडळींनी स्वतःच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कार्यकर्त्यांच्या नावाने (ते देखील स्वतःच्या खर्चाने ) " समाजसेवक " अशा नावाने लावलेल्या बॅनर्समधून ते समाजसेवक आहेत हे नागरिकांना माहित पडते . बॅनर्स व्यतिरिक्त समाजकार्यात हे कुठेच दिसत नाहीत . समाज मान्यता नसलेल्या अशा "स्वयंघोषित समाजसेवकांची " भाऊगर्दी मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसते आहे. आणखी महत्वाची गोष्ट म्हणजे या समाजसेवकांचा भूतकाळ कसाही असला तरी त्यांचे भविष्य किती उज्वल , महान असणार हे देखील जनतेला वेळोवेळी लागणाऱ्या बॅनर्समधूनच कळते . यांचे भविष्य असते 'भावी सरपंच , भावी पंचायत समिती -जिल्हा परिषद सदस्य -अध्यक्ष , भावी आमदार -खासदार " . जनतेने ठरवण्याआधीच यांचे पद फिक्स झालेले असते हे विशेष . त्यांच्या कर्तृत्वाचा , समाजसेवेचा आलेख गुप्तच राहताना दिसतो . महाराष्ट्रातील तमाम नागरिकांना प्रश्न हा आहे की , सणउत्सव , निवडणुकांचा काळ वगळता हि समाजसेवक मंडळी नेमकी कुठे असतात ? समाजसेवकांची एवढ्या मोठ्या प्रमाणावर संख्या असून देखील महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न -समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित का राहतात ? समाजसेवकांच्या समाजसेवेचे प्रतिबिंब प्रत्यक्ष समाजात उमटताना का दिसत नाही . अत्यंत खेदाची गोष्ट हि आहे की जेंव्हा जेंव्हा उत्सवांच्या निमित्ताने बॅनर्स लावले जातात तेंव्हा तेंव्हा असे दिसते की ज्या देवतेचा उत्सव आहे त्या देवतेचा फोटो कुठे तरी कोपऱ्यात लहान असतो . कार्यकर्त्यांच्या भाऊगर्दीत दिसून पण येत नाही पण तथाकथित समाजसेवकांचे फोटो मात्र देवतांच्या फोटो पेक्षा मोठे असतात . देवापेक्षा हि महान असल्याची प्रचिती यांना झालेली असती की काय ? अशी भावना जनमानसात निर्माण झालेली दिसते . आणखी महत्वाची गोष्ट म्हणजे ९० टक्क्याहून अशा समाजसेवकांचे , नेत्यांना विविध प्रसंगी देण्यात येणाऱ्या शुभेच्छांचे बॅनर्स देखील हि मंडळी स्वतःच्या पैशानेच स्वतःच लावतात . बॅनर्सवर झळकणाऱ्या कार्यकर्त्यांना देखील आपल्या नेत्याचा वाढदिवस आहे , नेत्याला अमुक -तमुक पद प्राप्त झाले आहे हे बॅनर्समधूनच कळते . खरे 'समाजमान्य समाजसेवक ' कसे असतात याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे रतन टाटा . टाटांइतके स्वतःच्या पैशाने समाजकार्य अन्य कोणीच करत नसेल . तरी देखील रतन टाटांचे रस्त्यावर ,सोशल मीडियावर समाजसेवक म्हणून कधी बॅनर्स झळकलेले दिसतात का ? कधीच नाही . अगदी रतन टाटांना महाराष्ट्र राज्याचा 'उद्योगरत्न ' हा पुरस्कार मिळाल्यावर देखील ना कुठे बॅनर्स झळकलेले दिसले , ना वर्तमानपत्रात पण भरून कौतुक करणाऱ्या जाहिराती प्रकाशित झालेल्या दिसल्या . याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांना अशा खोट्या प्रसिद्धीची गरजच पडत नाही कारण त्यांनी आपल्या कर्तृत्वातून , समाजसेवेतून प्रत्येकाच्या हृदयात स्थान मिळवलेले असते . ज्या गोष्टीतून फलनिष्पत्ती संभवत नाही त्यास वांझोटे असे संबोधले जाते . अलीकडच्या काळातील समाजसेवकांच्या बाबतीत देखील असेच होताना दिसते आहे . महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात अशा तथाकथित समाजसेवकांची भाऊगर्दी असली तरी त्यांचा कुठलाच लाभ प्रत्यक्ष समाजाला होताना दिसत नाही . फल निष्पत्ती शून्य अशा समाजसेवकांची बॅनरबाजी समाजमनाच्या दृष्टीने पूर्णतः निषेधार्यच ठरते . शेवटचा आणि अत्यंत महत्वाचा मुद्दा हा आहे की , स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमानुसार सार्वजनिक ठिकाणी बॅनर्स लावायचे असतील तर त्यासाठी परवानगी घेणे आवश्यक असते , जितक्या दिवसांसाठी बॅनर्स लावायचे आहे त्या दिवसांसाठीचे शुल्क भरणे अनिवार्य असते . पण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या नियमाला पायदळी तुडवत सर्रासपणे मोफत व अनधिकृतपणे संपूर्ण राज्यभर बॅनरबाजी केली जाते . मा . न्यायालयाने आदेश देऊन देखील स्थानिक स्वराज्य संस्थातील संलग्न अधिकारी अनधिकृत बॅनर्सवर कारवाई करण्याचे धाडस दाखवताना दिसत नाही . स्थानिक लोकप्रतिनिधींच्या बोटावर नाचणारे स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन कठपुतळ्या सारखे झालेले असल्याने प्रशासनाचा धाक उरलेला नाही .गणपती बाप्पा ला बुद्धीची देवता असे मानले जाते . गणपती बाप्पाला एकच प्रार्थना आहे की कुठलेही सामाजिक काम न करणाऱ्या लाखो तथाकथित समाजसेवकांना सुबुद्धी दे . त्यांना हि समज दे की समाजसेवेची काम नसेल करणार तरी हरकत नाही पण किमान खेडी -शहरे बॅनर्स लावून बकाल तरी करू नका . अशा वांझोट्या समाजसेवकांची जनतेला बिलकुल आवश्यकता नाही आणि सहानभूती हि नाही . असेल तर तुमच्या विषयी चीडच आहे .


**सुधीर लक्ष्मीकांत दाणी :**
danisudhir@gmail.com
9869226272


# तब्बल आठ वर्षां नी उलगडले मुंबईतील महिलेच्या में दूतील गाठीचे रहस्य !हार्मोन बदलांमुळे शरीरात झाले होते विचित्र बदल

मुंबई- आपले वय जसे वाढते तसे आपल्या शरीरात वयानुसार बदल होत असतात परंतु दक्षिण मुंबईत ऑफिसला जाणारी ४४ वर्षीय महिलेच्या शरीरात ८ वर्षांच्या कालावधीत वेगळेच बदल होत गेले. या बदलांमुळे त्या महिलेला कामावर जाणे सुद्धा अशक्यप्राय झाले. या शारीरिक बदलांमध्ये प्रामुख्याने नाकाचा आकार वाढणे, हातापायांवर पुरुषासारखे केस वाढणे, मासिक पाळी अनियमता, वजन वाढणे तसेच आवाजात बदल असे विचित्र बदल होत गेले त्यामुळे या महिलेला घरातून बाहेर निघायला लाज वाटू लागली व त्या डिप्रेशनमध्ये जाऊ लागल्या. स्त्रीरोगतज्ञाला भेट दिली असता त्यांनी ओटीपोटाची सोनोग्राफी करून पीसीओडीचा आजार असल्याचे सांगून औषधे सुरु केली परंतु शारीरिक बदलात कोणताही फरक दिसून आला नाही. एकदा ही महिला कानाचे उपचार घेण्यासाठी ईएनटी डॉक्टरांना भेट दिली त्यावेळी कदाचित हा आजार मेंदूसंबंधित आजार असल्याची शक्यता वर्तवली व ठाणे येथिल सोलारीस हॉस्पिटमधील मेंदूविकार तज्ञ व शल्य चिकित्सक डॉ अमित ऐवळे यांचा सल्ला घेण्यास सांगितले. याविषयी अधिक माहिती देताना मेंदूविकार तज्ञ व शल्य चिकित्सक डॉ अमित ऐवळे सांगितले, " आम्ही लगेचच या रुग्णाच्या प्रमुख वैद्यकीय तपासण्या केल्यावर तिला अँक्रोमेगालीचा त्रास आहे जो प्रौढांमध्ये ग्रोथ संप्रेरकाच्या अति स्रावामुळे होणारा हार्मोनल विकार आहे. आम्ही एमआरआय आणि तपशीलवार हार्मोनल मूल्यांकन केले. अँक्रोमेगाली हा एक हार्मोनचा विकार आहे यामध्ये तुमचे शरीर जास्त प्रमाणात हार्मोन बनवते प्रामुख्याने पिट्यूटरी ग्रंथी मध्ये हे हार्मोन्स वाढतात व या ग्रंथी शरीराची शारीरिक वाढ नियंत्रित करत असतात, जर हे हार्मोन्स जास्त प्रमाणात वाढले तर हाडे, कूर्चा, शरीराचे अवयव आणि इतर ऊतींचा आकार वाढत जातो. एमआयआर तपासणीमध्ये मेंदूच्या पिट्यूटरी ग्रंथीमध्ये १.५ x २ सेमी आकाराचा ट्युमर आढळला, याच ट्युमर मुळे या महिलेच्या शरीरात गेल्या आठ वर्षांपासून विचित्र बदल होत होते. आम्ही तात्काळ ट्रान्स नेसल पिट्युटरी मॅक्रो एडेनोमा एक्सिजन सर्जरी म्हणजेच नाकाद्वारे एंडोस्कोपिक तंत्रज्ञानाचा वापर करून तो ट्युमर काढून टाकला. या सर्जरीसाठी लागणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान तसेच अनुभवी वैद्यकीय टीम सोलारिस हॉस्पिटलमध्ये उपल्बध असल्याने हि सर्जरी यशस्वी झाली व पुढील चार दिवसांमध्ये आम्ही महिलेला घरी पाठविले. पुढील २ महिन्यात या महिलेच्या शरीरातील



हार्मोनस चा आजार पूर्णपणे बरा झाला तसेच ज्या अवयवांमध्ये विचित्र वाढ झाली होती ती कमी होऊन त्या महिलेची मासिक पाळी नियमित झाली."आज आपल्या देशामध्ये जागतिक दर्जाचे वैद्यकीय उपचार उपलब्ध असूनही ठराविक रोगाचे निदान न झाल्यामुळे अनेक रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागतो. या केसमध्ये सुद्धा रोगाचे निदान वेळेवर न झाल्यामुळे अनेक वर्षे त्रास सहन करावा लागला अशी माहिती सोलारीस हॉस्पिटमधील मेंदूविकार तज्ञ व शल्य चिकित्सक डॉ अमित ऐवळे यांनी सांगितले.

# शाळा देणगीदाराच्या नावे करणे कितपत योग्य आहे?

राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी ५ सप्टेंबर रोजी 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार' समारंभात चक्क शिक्षक दिनीच राज्यातील शाळा कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यांना दत्तक देण्यासंदर्भात मत व्यक्त केले आणि शासनाने तातडीने १६ सप्टेंबर रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या सुमारे ६२ हजार शाळांसाठी 'दत्तक शाळा योजने'ला मंजुरी दिली. 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' या गोंडस नावाखाली शासन शिक्षणाच्या जबाबदारीतून हात तर झटकत नाही ना, अशी शंका राज्यातील नागरिकांच्या मनात घर करून आहे. शिक्षणाच्या जबाबदारीचे ओझे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला झेपत नाही का, हा प्रश्न या निमित्ताने अधोरेखित झाला आहे. याच दरम्यान शासनाने महाराष्ट्रातील मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी तब्बल चोवीसशे कोटींचा निधी मंजूर केला. दत्तक शाळा योजना आणि मंदिरांना कोटींचा निधी या दोन्ही शासन निर्णयांमधून शासनाला नेमके कशाला प्राधान्य द्यायचे आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.



प्रस्तुत लेखाच्या माध्यमातून मंदिर विरुद्ध ज्ञानमंदिर असे चित्र उभे करायचे नाही. मात्र मंदिराइतकेच ( खरेतर मंदिरापेक्षा अधिक ) प्राधान्य ज्ञानमंदिराला दिले पाहिजे अशी महाराष्ट्राचा एक नागरिक या नात्याने अपेक्षा ठेवणे नक्कीच अनाठायी ठरणार नाही. या निमित्ताने कर्मवीर भाऊराव पाटील यांची प्रकर्षाने आठवण येते. शाळेला असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव बदलणार नाही, म्हणत देणगी नाकारणाऱ्या कर्मवीरांच्या महाराष्ट्रात शिक्षणाची जबाबदारी झटकत गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे मृगजळ दाखवून शाळा खासगी कंपन्यांना देण्याचा निर्णय शासन कसा काय घेऊ शकते, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.

दत्तक शाळा योजनेला सर्व शिक्षक संघटनांचा विरोध आहे. शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांच्या पालकांचा लक्षवेधी निषेध राज्यात सुरू झाला आहे. सामान्य नागरिकसुद्धा हा निर्णय मागे घेण्याची मागणी करत आहेत. सरकारने या निर्णयाचा फेरविचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीची आर्थिक तरतूद राज्याच्या विकासाची खरी गुंतवणूक असते. ही गुंतवणूक सरकारला अनावश्यक खर्च वाटत असेल, तर ते योग्य नाही. दत्तक शाळा योजनेच्या माध्यमातून 'शाळांच्या भौतिक सुविधांसाठी शासन यापुढे निधी देऊ शकणार नाही' असे तर सांगायचे नाही ना? जर असे असेल तर येत्या काळातील शैक्षणिक भवितव्याची कल्पनाच न केलेली बरी आहे.

आपला मंदिरांना विरोध नाहीच. आत्मिक समाधानासाठी मंदिरे असावीत. मात्र आत्मबल मजबूत करून जीवनाचा पाया रचणाऱ्या ज्ञान मंदिरांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, हेही नाकारता येणार नाही, याची जाणीव ठेवावी लागेल. मंदिरांना सोन्याचा कळस मिळाला तरी हरकत नाही मात्र ज्ञानमंदिराचे किमान छप्पर तरी गळू नये, याची काळजी तर शासनाने घेतलीच पाहिजे. मंदिरात कितीही मोठी देणगी दिली तरी देणगीदारचे फक्त नाव देणगीदारांच्या यादीमध्ये मोठ्या अक्षरात लिहिले जाते, मात्र इथे तर चक्क शाळांची नावे बदलण्यास सरकारने परवानगी दिली आहे. शिक्षणाचे हे बाजारीकरण शाळांच्या जीवावर उठणार नाही याची हमी सरकार तरी देऊ शकणार आहे का? सरकारी शाळांना खासगी कंपन्यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध होत असेल तर स्वागतच आहे, मात्र ज्या पद्धतीने व्यवहार मांडला जात आहे ती पद्धत नक्कीच व्यवहार्य नाही. देणगीदाराचे नाव शाळेच्या कार्यालयात दर्शनी भागावर मोठ्या अक्षरांत लिहायला हरकत नाही. मात्र शाळाच देणगीदाराच्या नावावर करणे कितपत योग्य आहे, हे आताच ठरवावे लागेल.

भक्तांची देवावर फार श्रद्धा असते. कुणाची कुणावर श्रद्धा असावी हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. खरे भक्त तर मंदिरांना दान देताना मागेपुढे पाहत नाहीत. मोठमोठी रक्कम मंदिरांना देणगी स्वरूपात देतात. एकीकडे मंदिरामध्ये अभिषेक, महाप्रसाद वा अन्नदानाची पावती फाडण्यासाठी भक्तांची मोठी रांग लागलेली असते तर दुसरीकडे शिक्षक शाळेसाठी देणगी मागत गावात फिरतात तेव्हा बहुतेकदा रिकाम्या हातांनीच माघारी परतण्याची वेळ त्यांच्यावर येते.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्यकार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग
भाईंदर (प.) ता जि ठाणे 401101
दूरध्वनी क्रमांक 022-28182828 EXT-289
क्रीडा विभाग

जा.क्र.मनपा/क्री.वि./६४/2023-24 दि. २१/०९/२०२३

// जाहिर निविदा //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रीडा विभागाच्या वतीने जिल्हा स्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी लागणारे खेळाचे साहित्य पुरवठा करण्यात येणार आहे (अदाजित खर्च रु 300000/-) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.mbmc.gov.in Off-line पध्दतीने इच्छुक ठेकेदाराकडून बी-1 नमुन्यात निविदा मागविण्यात येत आहेत. सदरकामी अधिक माहिती क्रीडा विभाग, पहिला मजला, मुख्यकार्यालय, भाईंदर (प.) येथे दि. २९/०९/२०२३ रोजी पर्यंत उपलब्ध होईल भरलेले निविदा दि. ०४/१०/२०२३ रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत क्रीडा विभागात स्विकारण्यात येतील सदरकामी निविदा फॉर्म रक्कम रु.300/- + जीएसटी 18% असे एकुण रु.354/- दि. ०३/१०/२०२३ रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत व इसारा रक्कम रु.3000/- रोखीने दि.०३/१०/२०२३ रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत भरुन त्याची पावती निविदा दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक राहील.

सदरील निविदा शक्यतो त्याच दिवशी कागदपत्रांची पुर्तता केली असल्यास उघडण्यात येतील सदरकामी निविदा मंजुर होताच त्वरीत काम करुन दयावे लागेल. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (क्रीडा विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र मनपा/मावज / ३२१/२०२३-२४
दिनांक २१/०९/२०२३

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार २६ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर - २०२३


## “जे घडले तेच सांगितले”, फडणवीसांनी ज्याला धक्काबुक्की के त्याचा आरोप त्याचाच व्हिडीओ पोस्ट करत बावनकु ळे म्हणाले

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीनी नागपूरमधील पुराची पाहणी करताना एका व्यक्तीला धक्काबुक्की केल्याचा आरोप विरोधकांनी केला. यावर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी ज्याला धक्काबुक्की झाल्याचा आरोप आहे त्याचाच व्हिडीओ पोस्ट करत प्रत्युत्तर दिलं आहे. यात त्यांनी देवेंद्रजी फडणवीसांवर आरोप करणारे विरोधक तोंडावर आपटले, असं म्हटलं. तसेच त्या व्यक्तीने जे घडले तेच सांगितले आणि त्या व्हायरल व्हिडीओचे हे आहे सत्य, असंही नमूद केलं.



चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, “नागपुरातील पूरपरिस्थितीची पाहणी करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका नागरिकाचा हात ओढला, असा आरोप करीत विरोधकांनी सोशल मीडियावर एक विपर्यस्त व्हिडीओ व्हायरल केला होता. या व्हिडिओत दिसत असलेल्या व्यक्तीचा देवेंद्र फडणवीस यांनी हात ओढल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. पण यामागील वस्तूस्थिती आणि सत्य आता अखेर उघड झाले आहे. त्या संबंधित व्यक्तीने स्वतःहून समोर येत या विषयातील वस्तूस्थिती आज जनतेसमोर कथन केली.” “सुरक्षारक्षक आणि पोलीस मला फडणवीसांपर्यंत पोहचू देत नव्हते” “या व्हिडीओमध्ये त्या व्यक्तीने म्हटलं आहे की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमच्या भागात पूर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आले. यावेळी नागरिकांशी ते चर्चा करीत असताना गर्दीमुळे सुरक्षारक्षक आणि पोलीस मला फडणवीस यांच्यापर्यंत पोहचू देत नव्हते. ही गोष्ट फडणवीस यांच्या लक्षात येताच त्यांनी माझा हात धरला आणि चल बाबा मी तुझ्या घरी येतो असे म्हणत मला ते माझ्या घरी पाहणी करायला घेऊन गेले,” अशी माहिती बावनकुळेंनी दिली. “देवेंद्र फडणवीस हा व्यक्ती देवमाणूस” “आता स्वतः या नागरिकानेच वस्तूस्थिती समोर आणल्याने कालपासून कोल्हेकुई करणारे विरोधक आणि त्यांची भाडोत्री ट्रोलर्स मंडळी तोंडावर आपटली आहेत. ‘सत्य अस्वस्थ होईल, पण पराभूत होत नाही’ या उक्तीचे यानिमित्ताने प्रत्यंतर आले आहे. देवेंद्र फडणवीस हा व्यक्ती देवमाणूस आहे. या देवमाणसावर केलेले खोटे आरोप जास्त काळ टिकत नाहीत. त्यांचे विरोधक तोंडघशी पडतात हा अनुभवही यानिमित्ताने आला असेल,” असंही चंद्रशेखर बावनकुळेंनी नमूद केलं.

## कॅफेच्या छुप्या खोलीत अश्लील चाळे, बेडचीही सोय; कोल्हापुरात धाड, निर्भया पथकाला काय काय सापडलं?

कोल्हापूरः शहरातील टाकळा चौकातील टोकियो कॅसल कॅफेवर कोल्हापूर पोलिसांच्या निर्भया पथकाने छापेमारी केली असून या ठिकाणी अश्लील चाळे करणाऱ्या सहा जोडप्यांवर कारवाई केली. या कॅफेमध्ये आत छुपी खोली करून त्यात बेड देखील असल्याचं निर्भया पथकाच्या निदर्शनाला आलं. निर्भया पथकाच्या कारवाईने कॅफे मालकांचे धाबे दणाणले आहेत. अनेकदा नोटिसा बजावून, कारवाई करूनही कोल्हापुरातील कॅफ चालकांची मनमानी सुरूच असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यानंतर आज कोल्हापूरचे निर्भया पथक ॲक्शन मोडमध्ये आल्याचं दिसून आलं. टोकियो कॅसल कॅफे अश्लील चाळे चालतात याची माहिती पोलिसांनी मिळाली होती. त्यानंतर मंगळवारी दुपारच्या सुमारास निर्भया पथकाने कोल्हापूर शहरातील टाकाळा चौकातील टोकियो कॅसल कॅफेवर छापेमारी




केली. या कॅफेत अश्लील कृत्य करत असताना तरुण-तरुणी आढळले. या आधीही कारवाई या आधीही कोल्हापुरातील अनेक कॅफेवर निर्भया पथकाने छापेमारी केली होती. कॉलेजच्या नावाखील अंधाऱ्या खोलीत अश्लील चाळे करणाऱ्या जोडप्यांवर आणि कॅफे मालकांवर त्यावेळी कारवाई करण्यात आली होती. पथकाने शहरातील मिरजकर तिकटी, उमा टॉकीज चौक, हॉकी स्टेडियम, संभाजीनगर येथे छापेमारी केली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा कॅफेवर छापेमारी करत पोलिसांनी सहा जोडप्यांना ताब्यात घेतलं आहे आणि कॅफे मालकावर गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. शाळा, कॉलेजजवळ घुटमळणाऱ्या टोळक्यांवर कारवाईचा बडगा दरम्यान, शाळा, महाविद्यालय परिसरात विनाकारण घुटमळणारे तरुण, बसस्टॉप, शाळेच्या मार्गांवर थांबणारी तरुणांची टोळकी, भरधाव वेगाने जाणारे दुचाकीस्वार, बसस्टॉपवर गोंधळ घालणाऱ्या हुल्लडबाजांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाया करण्याच्या सूचना अप्पर पोलीस अधीक्षक जयश्री देसाई यांनी निर्भया पथकांना दिल्या आहेत.

## दिल्लीत 25 कोटींची चोरी; चोरांनी थेट छप्परच कापलं अन् हिऱ्या, सोन्याच्या दागिन्यांसह सर्वच घेऊन गेले

दिल्लीमध्ये 20 ते 25 कोटींच्या दागिन्यांची चोरी झाली आहे. उमराओ सिंह या शोरूममधून सोमवारी चोरांनी सर्वच्या सर्व दागिने चोरून नेले. रविवारी रात्री दुकान बंद करून मालक घरी गेले. सोमवारी दुकान बंद असतं. आज सकाळी दुकान उघडल्यावर दागिने लंपास झालेले दिसले. देशाची राजधानी दिल्लीतील जंगपुरा येथील ज्वेलर्सच्या शोरूममध्ये कोट्यवधींची चोरी झाली आहे. दुकानात ठेवलेले 20 ते 25 कोटी रुपयांचे हिरे आणि सोन्याचे दागिने चोरट्यांनी पळवून नेल्याचं शोरूम मालकांचं म्हणणं आहे. जंगपुरा येथील ज्या शोरूममध्ये चोरट्यांनी हात साफ केला, ते उमराव सिंह आणि महावीर प्रसाद जैन यांचं शोरूम आहे. दुकानात 20 ते 25 कोटी रुपयांचे हिरे आणि सोन्याचे दागिने ठेवण्यात आल्याचं शोरूम मालकानं सांगितलं आहे. जंगपुरा




बाजार सोमवारी बंद असतो. त्यामुळे रविवारी शोरूम बंद केल्यानंतर मालक थेट आज (मंगळवारी) शोरुममध्ये गेले. त्यांनी दुकानाचं टाळं उघडलं आणि पाहिलं, तर त्यांना धक्काच बसला. शोरुम मालकांनी दिलेल्या माहितीनुसार, शोरूममध्ये ठेवण्यात आलेले सर्वच्या सर्व दागिने चोरट्यांनी लंपास केले होते. दार उघडलं त्यावेळी एकही दागिना शोरूममध्ये नव्हता. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि तात्काळ तपास सुरू केला. टाळं तर शोरूम मालकांनी उघडलं मग चोरांनी चोरी कशी केली? असा प्रश्न सर्वांच्यात मनात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी छत कापलं आणि तिथून शोरूममध्ये प्रवेश केला आणि हात साफ केला. स्ट्राँग रूमची भिंत कापून चोरट्यांनी आत प्रवेश दरम्यान, जंगपुरा मारटच्या या इमारतीत अनेक दुकानं होती, शोरूमच्या शेजारीच पायऱ्या आहेत, जिथून चोरट्यांनी दुकानात प्रवेश करण्यासाठी छत कापलं होतं. कापलेल्या छताची व्हिडीओ क्लिपही समोर आली असून, त्यात चोरट्यांनी छोटी जागा कापून दुकानात प्रवेश केल्याचं दिसत आहे. मात्र, या घटनेचे कोणतेही सीसीटीव्ही फुटेज अद्याप समोर आलेले नाहीत, ज्यावरून चोरट्यांची ओळख पटू शकेल.

हिरे-सोन्याचे सगळे दागिने लंपास

मिळालेल्या माहितीनुसार, चोरांनी सोन्याचे आणि हिऱ्याचे सर्वच्या सर्व दागिने लंपास केले. परंतु, चांदीचे काही दागिने शिल्लक असल्याचं बोललं जात आहे. शोरुमचे मालक रविवारी साधारणतः साडेआठ वाजता दुकान बंद करून गेले होते. पोलिसांचं म्हणणं आहे की, ही चोरी रविवारी रात्री झाली असावी.

## 'रोडरोमिओं'वर कारवाई, गाडी पकडली म्हणून आमदाराची थेट धमकी; पोलिसांनीही स्टे शन डायरीला नोंद घेतली

नांदेड : जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, चक्क एका आमदाराने पोलीस अधिकाऱ्यांना फोनवरून धमकी दिली आहे. विना नंबरची दुचाकी सोडून देण्याची मागणी आमदाराने केली होती, मात्र पोलिसांनी कायदेशीर कारवाई केल्याने या आमदाराला राग आला. त्यामुळे तुम्हाला निलंबित करतो आणि अधिवेशनात तारांकित प्रश्न विचारणार असल्याची धमकी या आमदाराने दिली. आमदाराने दिलेल्या धमकीनंतर संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी याची नोंद थेट स्टेशन डायरीत केली आहे. त्यामुळे या प्रकरणाने पोलीस दलात आणि राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. श्यामसुंदर शिंदे असे या आमदाराचे नाव असून, ते शेतकरी कामगार पक्षाचे आमदार आहेत. विना नंबरची दुचाकी कारवाई न करता सोडून देण्यावरून आमदारांनी फोनवरून पोलीस




निरीक्षक आणि उपनिरीक्षकांना धमकी दिल्याची घटना नांदेडमध्ये समोर आली आहे. त्यामुळे पोलिसांनीही कडक भूमिका घेत स्टेशन डायरीमध्ये याची नोंद केली. नांदेड जिल्ह्यातील लोहा पोलीस स्टेशन हद्दीत हा प्रकार घडला आहे. त्यामुळे या घटनेची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. नेमकं काय घडलं? नांदेडच्या लोहा शहरातील रोडरोमोमियो आणि चोरीच्या दुचाकीबाबत पोलीसांकडून कारवाई सुरु होती. या कारवाई दरम्यान एका माजी नगरसेवकाची विना नंबरची दुचाकी पोलिसांना दिसून आल्याने त्यांनी त्याला अडवून चौकशी सुरु केली. मात्र, त्याच्याकडे कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याने आणि संशय आल्याने पोलीसांनी ही दुचाकी पोलीस ठाण्यात नेली. पण, या दुचाकीवर कारवाई न करता सोडून द्यावी यासाठी आमदार श्यामसुंदर शिंदे यांचा पोलीस उपनिरीक्षकाला आला. तसेच कोणतेही कारवाई करू नका आणि ती गाडी सोडून द्या असे आदेश आमदार शिंदे यांनी दिले. तसेच दुचाकी न सोडल्यास थेट निलंबित करण्याची थेट धमकी दिली. पोलीस उपनिरीक्षकांनी दुचाकी सोडण्यास नकार दिल्याने आमदार शिंदे यांनी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांना फोन लावून त्यांना देखील दुचाकी सोडण्यास सांगितले. तसेच चिंचोळकर यांनाही तारांकीत प्रश्न करू आणि तुमच्यावर कारवाई करू अशी धमकी दिली.

## मामीच्या प्रेमात गुंग भाच्याने उचललं टोकाचं पाऊल, दारु पाजून रेल्वे ट्रॅकवर झोपवलं; पुढे जे झालं...

बरेली : मामीसोबतच्या प्रेमसंबंधामुळे भाच्या मामाचा काटा काढल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. मामीसोबत प्रेमसंबंध असल्यामुळे भाच्याने मामाची हत्या केल्याने खळबळ माजली आहे. उत्तर प्रदेशातील बरेली येथील ही धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या हत्येमध्ये भाच्याला त्याच्या मित्रानेही साथ दिल्याची माहिती समोर येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे ह प्रेम एकतर्फी नव्हतं तर, मामी ही भाच्याच्या प्रेमात असल्याची बोललं जात आहे. भाच्याकडून मामाची हत्या बरेलीमधील या घटनेमुळे एकच खळबळ माजली आहे. मामी आणि भाचा एकमेकांच्या आकंठ प्रेमात बुडालेले होते. मामी आणि भाचा यांच्यासोबत त्याचा मित्र या सर्वांनी मिळून मामाला संपवण्याता घाट घातला. त्यानंतर मामाला बेशुद्ध अवस्थेत रेल्वे ट्रॅकवर झोपवल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

मामी आणि भाच्याचे प्रेमसंबंध

मामी आणि भाच्याचे लग्नाआधीच प्रेमसंबंध होते. लग्नानंतरही यांच्यातील संबंध कायम होते आणि त्यांनी मामाचा काटा काढायचं ठरवलं. पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, महिलेने तिच्या मानलेल्या भाच्यासोबत असलेल्या प्रेमसंबंधातून पतीच्या हत्येचा कट रचला. भाच्याने त्याच्या मित्रासोबत मिळून मामाची हत्या केली. महिलेने तिचा प्रेमी आणि प्रेमीच्या मित्रासोबत मिळून पतीच्या हत्येचा कट रचला. पतीच्या हत्येनंतर महिला प्रेमीसोबत राहण्याच्या विचारात होती. मात्र, त्याआधीच या प्रकरणाचा खुलासा झाला. या प्रकरणी पोलिसांनी तिघांनाही अटक केली आहे. नक्की प्रकरण काय?

आरोपीने चौकशीत पोलिसांना सांगितलं की, मृत रामवीरची पत्नी आरतीचे लग्नापूर्वी प्रेमसंबंध होते. लग्नानंतर रामवीर तिच्या मार्गात आला, त्यामुळे आरतीने कट रचून पतीची हत्या केली. प्रेमी मानवेंद्र आणि त्याचा मित्र सौरव याने आरतीचा पती रामवीर याला पार्टीच्या बहाण्याने बोलावले. त्यांनी रामवीरला बेशुद्ध होईपर्यंत दारू पाजली. रामवीर बेशुद्ध झाल्यावर त्याला रेल्वे रुळावर फेकलं. यानंतर रेल्वेची धडक बसून रामवीरचा मृत्यू झाला. हा गुन्हा केल्यानंतर आरती आणि मानवेंद्र एकत्र राहू लागले.

रामवीरच्या मृत्यूप्रकरणी पोलीस तपासात हा कट उघडकीस आला. एसपी ग्रामीण म्हणाले की, फतेहगंज पूर्व येथील मृत रामवीरच्या हत्येप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृताचा भाचा मानवेंद्र, आरोपीचा मित्र सौरभ आणि मृताची पत्नी आरती या तिघांना अटक करण्यात आली आहे.

## "मला कॅ न्सर आहे, फक्त शेवटचं..."; जुगार खेळण्यासाठी खोटं बोलला, पठ्ठ्यानं जमवलं 10 लाखांचं डोनेशन

अनेकजण खोटं बोलून आपली हौस पूर्ण करत असल्याची अनेक उदाहरणं आपण पाहतो. कधी दुसऱ्यांबाबत खोटं सांगून, तर कधी स्वतःच्या आजारपणाचा बनाव करुन खोटं बोललं जातं. गंभीर आजाराचा बनाव करुनदेखील मदत म्हणून पैसे उकळल्याची अनेक उदाहरणं आपण पाहिली आहेत. असंच एक प्रकरण सध्या समोर आलं आहे. आपल्याला कॅन्सर झाला आहे, असं सांगत या तरुणानं



उपचारांसाठी लोकांकडून लाखो रुपये उकळले आहेत. एवढंच नाहीतर त्यानं आजारपणाचा बनाव रचला, उपचारासाठी पैसे उकळले आणि त्या पैशांनी हा पठ्ठ्या चक्क जुगार खेळला. दरम्यान, या तरुणानं स्वतःचा गुन्हा कबूल केला आहे.

कॅन्सरसारख्या गंभीर आजाराच्या उपचारासाठी खूप पैसे लागतात. तसेच, काही सेवाभागी संस्था, ट्रस्टही गरजू रुग्णांना मदत करतात. अनेकदा काही संस्था डोनेशन कॅम्पही चालवतात. अशा कॅम्पमधून अनेकदा रुग्णाच्या उपचारासाठी कोट्यवधींची रक्कम गोळा केली जाते. याचाच फायदा कॅलिफोर्नियात राहणाऱ्या रॉबर्ट मर्सर नावाच्या तरुणानं घेतला.

## नवे जामतारा...फक्त 'या' 10 जिल्ह्यातून होतात देशातील 80 टक्के सायबर गुन्हे

नवी दिल्ली : आतापर्यंत झारखंडचे जामतारा आणि हरियाणाचे नूह हे सायबर गुन्ह्यांचे केंद्र म्हणून ओळखले जात होते. आता सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत राजस्थानच्या भरतपूर आणि उत्तर प्रदेशातील मथुरा हे जिल्हेदेखील केंद्रस्थानी आले आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) कानपूरमध्ये सुरू झालेल्या एका स्टार्टअपने आपल्या संशोधनात हा दावा केला आहे. संशोधनानुसार, देशभरातील 80 टक्के सायबर गुन्हे हे टॉप 10 जिल्ह्यांमधून घडतात.

टॉप 10 सायबर गुन्हे जिल्हे आयआयटी कानपूरमधील फ्युचर क्राइम रिसर्च फाउंडेशन (FCRF) या ना-नफा स्टार्टअपने दावा केला आहे. या स्टार्टअपने आपल्या ‘अ डीप डायव्ह इन सायबर क्राइम ट्रेंड्स इम्पॅक्टिंग इंडिया’ या संशोधनात हा दावा केला आहे.

FCRF नुसार, भरतपूर (18 टक्के), मथुरा (12 टक्के), नूह (11 टक्के), देवघर (10 टक्के), जामतारा (9.6 टक्के), गुरुग्राम (8.1 टक्के), अलवर (5.1 टक्के), बोकारो (2.4 टक्के), कर्मा टंड (2.4 टक्के) आणि गिरीडीह (2.3 टक्के) हे जिल्हे भारतातील सायबर गुन्ह्यांमध्ये आघाडीवर आहेत. या 10 जिल्ह्यातून एकत्रितपणे 80 टक्के सायबर गुन्हे घडतात.

नूंह पोलिसांनी केला होता गौप्यस्फोट

FCRF चे सह-संस्थापक हर्षवर्धन सिंग म्हणाले, “आमचे विश्लेषण भारतातील 10 जिल्ह्यांवर केंद्रित होते जिथे



सर्वाधिक सायबर गुन्हे घडतात. "संशोधन पेपरमध्ये, या जिल्ह्यांतील सायबर गुन्ह्यांचे प्रमुख कारण समजून घेणे प्रभावी प्रतिबंध आणि निर्मूलन धोरणे तयार करण्यासाठी आवश्यक आहे."

देशातील वाढती सायबर गुन्हेगारी ही चिंतेची बाब आहे. असे फसवणूक करणारे नवनवीन डावपेच अवलंबतात आणि लोकांना आपला बळी बनवतात. नुकतेच सायबर गुन्ह्याबाबत नूह पोलिसांनीही धक्कादायक माहिती उघड केली होती. सायबर गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या बहुतांश हॅकर्सनी बारावीपर्यंतच शिक्षण घेतल्याचे पोलिसांनी सांगितले होते, तर काही हॅकर्स निरक्षरही होते.

आठ महिन्यात पुणेकरांनी गमावले 20 कोटीपेक्षा जास्त रुपये

पुणे (Pune News) शहरात ऑनलाईन फसवणुकीच्या (Online Fraud) घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांपासून अशा अनेक घटना समोर आल्या आहेत. आठ महिन्यात पुणेकरांनी 20 कोटी पेक्षा जास्त रुपये गमावले आहे. पुणे सायबर पोलीस स्टेशन येथे आत्तापर्यंत जानेवारी 2023 ते 31 ऑगस्ट या आठ महिन्यात 1114 विविध गुन्ह्यांचे अर्ज हे आले असून यात फक्त ऑनलाईन टास्क या गुन्ह्यात 20 कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची फसणूक झाली आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898